# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

बुधवार, दि. ३०.११.२०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| कंठेवाड सविता मारोतराव | पांढरे स्नेहा सुधाकर |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खाँ इलीयास खाँ |
| अंजुम बेगम शेख अफरोज | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनिल | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| सय्यद जानी म. कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजिया बेगम अयुब खान |
| सलिमा बेगम नुंरुल्ला खान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | गायकवाड अंजली सुरेशराव |
| सय्यदा इतरत फातेमा मजहर हुसेन | गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ |
| अ. हबीब अ. रहीम बागवान | बिपाशा बेगम सय्यद वलीओद्दीन |
| अ. सत्तार अ.गफुर | आसीया बेगम अ. हबीब बागवान |
| कुरेशी चाँद पाशा खाजा | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| अ. लतीफ अ. मजीद | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| सुदर्शना महेश (बाळु) खोमणे | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| लतीफा बेगम बु-हाण खान | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| किशोर किशनलाल यादव | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक रमेशराव सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंगराव | देशमुख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे |
| विनय विश्वांबर पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजीराव | येवनकर विजय हिराचंद |
| अङ बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी, महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते

सर्व प्रथम नेहमी प्रमाणे वदेमातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**प्रमोद खेडकर** जम्मु काश्मिर भागातील नागरोटा येथे दहशतवायानी केलेल्या हल्यात भारताचे ५ जवान शहिर झालेले असून त्यामध्ये नांदेडचे भूमीपुत्र कै. संभाजी कदम यांचाही समावेश आहे. या शहीद जवानाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**सभागृहनेता** या पाच जवानामध्ये राज्यातील पंढरपुर येथील कुणाल गोस्वामी यांचाही समावेश आहे. तसेच शहीद विरजवान संभाजी कदम हे नांदेड जिल्हयाचे सुपूत्र असून त्यांना एक मुलगी आहे. या मुलीचे संगोपन, शिक्षण करीता आर्थिक मदत म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांचे एक महिण्याचे मानधन व तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कास्ट्रटाईब कर्मचारी कल्याण महासंघ, अल्पसंख्याक, वाहन चालक संघटना, शिक्षक संघटना, मनपा कर्मचारी युनियन या कर्मचारी संघटनांनी केलेल्या विनंतीनूसार महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व वर्ग – ३ च्या कर्मचा-यांचा एक दिवसाचा पगार असे मिळून एकूण रु. ११.०० लक्ष देण्यासाठी हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. सदरील आर्थिक मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या मार्फत शहीद वीरजवान संभाजी कदम यांच्या मुलीच्या नांवे मुलगी सज्ञान होई पर्यत राष्ट्रीयकृत बॅकेत ठेव म्हणून जमा करण्यासतसेच मुलगी सज्ञान होई पर्यत तिच्या शिक्षण व संगोपना करीता लागणारा खर्च या ठेवीच्या रक्कमेवर प्रतिमहा मिळणा-या

व्याजाच्या रक्कमेतून तीच्या पालकाने करावा, असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** सभागृहानेता यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार नांदेडचे भूमीपुत्र कै. संभाजी कदम यांचाही समावेश आहे. या शहीद जवानाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. शहीद विरजवान संभाजी कदम हे नांदेड जिल्हयाचे सुपूत्र असून त्यांना एक मुलगी आहे या मुलीचे संगोपन, शिक्षण करीता आर्थिक मदत म्हणून नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांचे एक महिण्याचे मानधन व तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कास्ट्रटाईब कर्मचारी कल्याण महासंघ, अल्पसंख्याक, वाहन चालक संघटना, शिक्षक संघटना, मनपा कर्मचारी युनियन या कर्मचारी संघटनांनी केलेल्या विनंतीनूसार महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व वर्ग – ३ च्या कर्मचा-यांचा एक दिवसाचा पगार असे मिळून एकूण रु. ११.०० लक्ष देण्यासाठी हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते सदरील आर्थिक मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या मार्फत शहीद वीरजवान संभाजी कदम यांच्या मुलीच्या नांवे मुलगी सज्ञान होई पर्यत राष्ट्रीयकृत बॅकेत ठेव म्हणून जमा करण्यास तसेच मुलगी सज्ञान होई पर्यत तिच्या शिक्षण व संगोपना करीता लागणारा खर्च या ठेवीच्या रक्कमेवर प्रतिमहा मिळणा-या व्याजाच्या रक्कमेतून तीच्या पालकाने करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १०७** **ठराव**

जम्मू काश्मिर मधील नागरोटा येथील लष्करी तळावरील अतिरेक्यच्या हल्यातील चकमकीत भारताचे पाच जवान शहीद झाले असून या शहीद जवानात नांदेड जिल्हयाचे भूमीपूत्र व जानापुरी येथील रहिवारी वीरजवान संभाजी कदम तसेच महाराष्ट्रातील पंढपुर येथील कर्नल किरण गोस्वावी यांचाही समावेश असल्यामूळे या सर्व ५ शहीद विरांना हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करुन त्यांच्या कुटूंबियावर ओढावलेल्या दुखात ही मनपा सर्वसाधारण सभा सहभागी होते.

शहीद विरजवान संभाजी कदम हे नांदेड जिल्हयाचे सुपूत्र असून त्यांना एक मुलगी आहे. या मुलीचे संगोपन, शिक्षण करीता आर्थिक मदत म्हणून नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांचे एक महिण्याचे मानधन व तसेच नांदेड वघाळा शहर महानगरपालिकेतील कास्ट्रटाईब कर्मचारी कल्याण महासंघ, अल्पसंख्याक, वाहन चालक संघटना, शिक्षक संघटना, मनपा कर्मचारी युनियन या कर्मचारी संघटनांनी केलेल्या विनंतीनूसार महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व वर्ग – ३ च्या कर्मचा-यांचा एक दिवसाचा पगार असे मिळून एकूण रु. ११.०० लक्ष देण्यासाठी हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते सदरील आर्थिक मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या मार्फत शहीद वीरजवान संभाजी कदम यांच्या मुलीच्या नांवे मुलगी सज्ञान होई पर्यत राष्ट्रीयकृत बॅकेत ठेव म्हणून जमा करण्यास तसेच मुलगी सज्ञान होई पर्यत तिच्या शिक्षण व संगोपना करीता लागणारा खर्च या ठेवीच्या रक्कमेवर प्रतिमहा मिळणा-या व्याजाच्या रक्कमेतून तीच्या पालकाने करावा, असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**बालासाहेब तरोडेकर** नांदेड येथील कै. सुधीर रावळकर यांचा अपघाती मृत्यू (ब्रेनडेड) झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियानी त्यांचे विविध अवयव गरजू रुग्णांना अवयवदान करण्याचा निर्णय घेतला व गरजु रुग्णाचे प्राण वाचविले त्याबध्दल रानवळकर व मोरे कुटुंबियांचे अभिनंदन करण्यात यावे तसेच हे अवयव विहित मुदतीत पुणे, मुंबई, औरंगाबाद येथील रुग्णालयात पाठविण्याचे कार्य (ग्रीन कॉरीडॉर) नांदेड येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यानी व महानगरपालिकेच्या अधिका-यांनी यशस्वीपणे पार पाडले त्याबध्दल वैद्यकिय अधिका-याचे व महानगरपालिका अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**प्रमोद खेडकर** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.१०८** **ठराव**

नांदेड येथील कै. सुधीर रावळकर यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर (ब्रेनडेड) त्यांच्या कुटुंबियानी सामाजिक बांधिलकीने त्यांचे विविध अवयव गरजू रुग्णांना अवयवदान करण्याचा निर्णय घेतला व गरजु रुग्णाचे प्राण वाचविले त्याबध्दल रानवळकर व मोरे कुटुंबियांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते तसेच हे अवयव विहित मुदतीत पुणे, मुंबई, औरंगाबाद येथील रुग्णालयात पाठविण्याचे कार्य (ग्रीन कॉरीडॉर) नांदेड येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यानी व महानगरपालिकेच्या अधिका-यांनी यशस्वीपणे पार पाडले व गरजु रुग्णांचे प्राण वाचविले त्याबध्दल शासकीय रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-याचे व महानगरपालिका अधिकारी व कर्मचा-यांचेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते

**अभिषेक सौदे** देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी यांनी काळा पैसा बाहेर येण्यासाठी ५०० व १००० रुपयाचे रध्द करणेचा जो निर्णय घेतला त्या दरम्यानच्या काळात आयुक्त श्री समिर उन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संतोष कंदेवाड, उपआयुक्त महसुल यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचा-यांनी रात्र दिवस मेहनत घेवून मालमत्ता कर, पाणी पटटी कर, विकास खर्च, मनपा दुकानाचे/जागेचे भाडे, व एलबीटीची १५-२० कोटी रुपयाची थकबाकी वसुल करुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळवुन दिले त्याबध्दल या सर्व अधिकारी व कर्मचा-याचे अभिनंदन करण्यात यावे तसेच देशाचे पंतप्रधान मा.श्री नरेंद्रजी मोदी यांनी काळा

पैसा बाहेर येण्यासाठी ५०० व १००० रुपयाचे नोंटा रध्द करण्याचा जो निर्णय घेतला त्याबध्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात यावे.

**महापौर** नोटा बंदीच्या काळात महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसुल मिळवून दिला त्याबध्दल सर्व अधिकारी व कर्मचा-याचे अभिनंदन करण्यात येते तसेच काळा पैसा बाहेर येण्यासाठी ५०० व १००० रुपयाच्या नोटा रध्द करण्याचा निर्णय घेतल्याबध्दल पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदीजी याचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव क्र.१०९** **ठराव**

देशाचे पंतप्रधान मा.श्री नरेंद्रजी मोदी यांनी काळा पैसा बाहेर काढण्यासाठी ५०० व १००० रुपयाच्या नोंटा रध्द करण्याचा जो निर्णय घेतला त्याबध्दल त्यांचे तसेच नोटाबंदीच्या काळात आयुक्त श्री समिर उन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संतोषकंदेवाड, उपआयुक्त महसुल यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचा-यांनी रात्र दिवस मेहनत घेवून मालमत्ता कर, पाणी पटटी कर, एलबीटी, विकास खर्च, मनपा दुकानाचे/जागेचे भाडे, १५-२० कोटी रुपयाची थकबाकी वसुल करुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळवुन दिले त्याबध्दल आयुक्त श्री समिर उन्हाळे, श्री संतोष कंदेवाड, उपआयुक्त (महसुल) व सर्व संबंधित अधिकारी व कर्मचा-याचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**सभागृहनेता** नुकत्याच महाराष्ट्र राज्य विधान परिषदेच्या निवडणूका झाल्या यामध्ये नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून मा. आ. श्री अमरभाऊ राजूरकर हे निवडून आले त्याबध्दल त्याचेही अभिनंदन करण्यात यावे.

**अ.सत्तार** या अभिनंदनाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत मा.श्री अमरभाऊ राजूरकर हे निवडूनआले त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव क्र.११०** **ठराव**

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य विधान परिषद निवडणूकीत नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून मा.आ.श्री अमराभाऊ राजुरकर हे विधान परिषदेवर निवडुन आले त्याबदल मा. आ. श्री अमरभाऊ राजुरकर यांचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सवानुमते अभिनदंन करते.

**अ.सत्तार** काळा पैसा बाहेर येण्यासाठी ५०० व १००० हजार रुपयाच्या नोटा रध्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने नागरीकांची खुप मोठी गैरसोय झाली, नोटा बंदीच्या काळात नोटा बदलण्यासाठी नागरीकाना बॅकेसमोर ८-८ तास लाईनीमध्ये उभे राहावे लागले यामूळे देशभरात जवळपास ६०-६५ नागरीकांचा मृत्यू झालेला असून या सर्व नागरीकांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** अचानक नोटा बंदीचा निर्णय घेण्यात आल्यामूळे नोटा बदलण्यासाठी नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास झाला असून या त्रासामूळै काही नागरीकांचा मृत्यू झाला त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी

**महापौर** श्री अ. सत्तार यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार नोटा बदलण्यासाठी नागरीकांना 8-8 तासे उभे राहावे लागेल यामध्ये ६०-६५ नागरीकांचा मृत्यू झाले त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते

**ठराव क्र. १११** **ठराव**

देशात ५०० व १००० रुपयाच्या नोंटा रध्दकरण्याचा निर्णय घेतल्यानंतर बंदी आणल्यानंतर ५०० व १००० रुपयाच्या नोटा बदलण्यासाठी नागरीकांना बॅकेसमोर 8-8 तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागल्यामूळे पुर्ण देशभरातून जवळपास ६५ नागरीकांचा रांगेत मृत्यू झाला अशा मृत पावलेल्या नागरीकांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभासर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

**दिपकसिंह रावत** विधान परिषदेची आचारसंहिता संपलेली आहे किंवा नाही याचा खुलासा आयुक्त साहेबांनी करावा कारण अनेक दिवसापासून शहरातील विकास कामे प्रलंबित आहे. यावर्षातील नगरसेवक स्वेच्छा निधीतून करावयाची कामे ही प्रलंबित आहे. आचारसंहिता संपली असेल तर लवकरात लवकर स्वेच्छा निधीतील व शासकीय निधीतील विकासाचे कामानां मान्यता देवून ती सुरु करण्यात यावी .आचारसंहिता संपली किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** शासन निर्देशानुसार विधान परिषद निवडणूक आचारसंहिता ही दि. २४.०१.२०१६ रोजी संपलेली असून आचारसंहिता संपल्यानंतर शहरातील विविध विकास कामाना मान्यता देण्यात येत आहे.

**उपमहापौर** निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ विधान परिषद निवडणूकीची आचारसंहिता पुर्ण जिल्हयाकरीता लागू केली होती परंतु यावर कॅबीनेट मध्ये निर्णय होवून आचारसंहिता काही प्रमाणात शिथिल केली त्याप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांना लेखी आदेश काढून विकास कामे सुरु करण्याचे आदेश द्यावयास पाहिजे होते. आचारसंहिता शिथिल झाल्याचे संबंधित विभाग प्रमुखांना अद्याप का कळविण्यात आलेले नाही.

**महापौर** आचारसंहिता लागल्या बरोबर तात्काळ आचारसंहिता लागू झाल्याचे आदेश काढण्यात येतात परंतु आचारसंहिता शिथिल झाल्याबरोबर आचारसंहिता शिथील झाल्याचे तात्काळ आदेश का काढण्यात येत नाही. आचारसंहितेची तात्काळ अमलबजावणी करण्यात येते मात्र आचारसंहिता शिथील झाल्याबरोबर त्याची

तात्काळ अमलबजावणी का करण्यात येत नाही. पदाधिका-याच्या वाहन चालकांना आचार संहिता शिथिल झाल्याचे आदेश देण्यात आलेले नाही.

**सरजितसिंघ गिल** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हदीत मराठा, मुस्लीम, दलित समाजाचे त्यांच्या विविध मागणच्या संदर्भात लाखोच्या संख्येने मोर्चे निघाले होते, मराठा व मुस्लीम या समाजाच्या मोर्चात लाखो नागरीक सहभागी झाले होते परंतु या मोर्चात कुठेही गालबोट न लागता अत्यंत शांततेत निघाले त्याबध्दल मी या समाजाचे अभिनंदन करतो. या समाजाच्या मागणीवर शासन विचार करील, परतु अत्यंत खेदाची बाब आहे की या मोर्चास महानगरपालिकेने ज्या सुविधा द्यावयास पाहिजे होत्या त्या दिलेल्या नाही. माजी महापौर, स.सदस्य श्री अ.सत्तार यांनी मुस्लीम समाजाचा भव्य मोर्चा निघणार असल्यामूळे सर्व मुख्य रस्त्याची साफसफाई करण्यासाठी संबंधित अधिका-यास सुचना करुनही त्यांनी व एटूझेडच्या कर्मचा-यांनी दुर्लक्ष करुन साफसफाई केली नाही त्याबध्दल मी त्यांचा निषेध करतो धिक्कार करतो. एटूझेड कंपनीस ब्लॅकलिस्ट मध्ये टाकलेले असतांनाही त्यांना ३ कोटीचे गाळ काढण्याचे काम दिलेले आहे. शहरात मुख्य रस्त्यावर साफसफाई करण्यात आलेली नाही.साफसफाईच्या कामामध्ये महानगरपालिकेचे अधिकारी व एटूझेड कंपनी संगनमताने मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करीत आहे. कामे न करणा-या अधिका-यावर व एटूझेड कंपनी विरुध्द तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. स्थायी समितीवर नविन निवड होणा-या सदस्यांना माझी विनंती राहिल की एटूझेड कंपनी विरुध्द कार्यवाही करुन लवकरात लवकर साफसफाईच्या कामासाठी नव्याने निविदा मागविण्याचा निर्णय घ्यावा.

**अ.सत्तार** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे, मुस्लीम समाजाचा भव्य मोर्चा निघणार असुन ज्या रस्त्याने मोर्चा जाणार आहे त्या रस्त्याची साफसफाई करण्यात यावी तसेच मोर्चा संपल्यानंतरही रत्यावर जमा होणारा कचरा उचलण्यात यावा अशा प्रकारच्या सुचना साफसाफाई विभागाचे सहायक आयुक्त श्री जाधव साहेबांना दिल्या होत्या व त्यानी साफसफाई करण्यात येईल असे सांगितले होते परंतु रस्त्याची साफसफाई करण्यासाठी कचरा उचलण्याकरीता एटूझेडचा एकही सफाई मजुर आला नाही एकही वाहन आलेले नाही. मोर्चातील स्वयंसेवकांनी रस्त्याची साफसफाई केली रस्त्यावर पडलेला कचरा उचलला त्याबध्दल मी मोर्चातील स्वयंसेवकाचे अभिनंदन करतो. यावेळी .एटूझेडची मजुर महानगरपालिकेचे मजुर कुठे गेले होते. मोर्चाच्या दिवशी मुख्य रत्याची साफसफाई करण्यासाठी स्वतंत्र टिम तयार करुन त्यांचे मार्फत रस्त्याची साफसफाई करावयास पाहिजे होती ती का करण्यात आलेली नाही याचा खुलासा संबंधिताकडुन मागवावा. या प्रकरणात जे अधिकारी दोषी आहेत त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**सभागृहनेता** जेव्हा शहरात विविध समाजाचे ५-६ लाखाचे मोर्चे निघतात त्यावेळी त्यांना आवश्यक त्या नागरी सुविधा देणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे.माजी महापौर व जेष्ठ सदस्य श्री अ.सत्तार यांनी मुस्लीम समजाच्या वतीने निघणा-या मोर्चाचे दिवशी आवश्यक ती साफसफाई करण्यात यावी मोर्चा निघाल्यानंतर रस्त्यावर पडलेला कचरा उचलण्याची व्यवस्था करण्यात यावी अशा प्रकारच्या सुचना करुनही सबंधित अधिका-यानी यासुचनेकडे दुर्लक्ष करुन काहीच कार्यवाही केलेली नाहीयामध्ये एटूझेड कंपनीपेक्षाही महानगरपालिकेचे संबंधित अधिकारीच जबाबदार आहे जेव्हा एवढया मोठया लोकसंख्येने मोर्चे निघतात तेव्हा त्यांना आवश्यक त्या सुविधा देण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे आद्य कर्तव्य आहे. सुचना करुनही संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असेल तर अशा अधिका-यांना पाठीशी न घालता त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी व भविष्यात असे होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**अशोक उमरेकर** श्री सरजितसिंघ गिल श्री अ,सत्तार, सभागृहनेते यांनी साफसफाईच्या कामासंदर्भात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत यामध्ये माझी एक सुचना आहे की एटुझेड कर्मचा-यांचा व संबंधित अधिकारी व कर्मचा-यांचा पगार कपात करुन जमा झालेला पैसा ज्या ज्या समाजाचे मोर्चे निघालेले आहेत त्या त्या समाजाच्या खात्यात वर्ग करण्यात यावा जेणे करुन तो पैसा समाजाच्या कामासाठी वापरता येईल.

**महापौर** नंदेड शहरात आपल्या समाजाच्या विविध मागण्याकरीता मराठा , मुस्लीम, दलित समाजाचे अत्यंत शांततेत भव्य मोर्चे निघाले होते त्यावेळी त्यांना महानगरपालिकेने साफसफाई, पिण्याचे पाणी, वैद्यकिय सुविधा देणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. परंतु माजी महापौर स.सदस्य श्री अ. सत्तार यांनी सुचना करुनही सुविधा देण्यात आलेल्या नाही ही खेदाची बाब आहे. मोर्चातील स्वयंसेवकांनी रस्त्यावरील कचरा उचलला नागरीकांना पिण्याची पाण्याचे वाटप केले हा त्यांनी चांगला आदर्श समाजापुढे ठेवला त्याबध्दल मी स्वयंसेवकांना धन्यवाद देते, ज्या अधिका-यांनी कर्मचा-यांनी साफसफाईच्या कामाकडे दुर्लक्ष केले त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी

**फारुख हुसेन** माझ्या प्रभागात ५००० दलितांची लोकसंख्या असतांनाही माझ्या प्रभागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत एक पैश्याच्या कामांना मान्यता देण्यात आलेली नाही. माझ्या प्रभागावर काय अन्याय करण्यात येत आहे.काही प्रभागात दलित वस्ती नसतांनाही त्या प्रभागाला दिड दिड कोटीचा निधी देण्यात आलेला आहे.

माझ्या प्रभागाला दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी का देण्यात आलेला नाही याचा खुलासा महापौरांनी करावा. तो पर्यत मी सभेचे कामकाज चालू देणार नाही.

**अशोक उमरेकर** माझ्याही प्रभागात दलिताची संख्या अधिक आहे परंतु माझ्याही प्रभागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी देण्यात आलेला नाही. माझ्या प्रभागातील दलित वस्तीला का वंचित ठेवण्यात येत आहे याचा खुलासा महापौरंनी करावा.

**महापौर** आजची सभा ही फक्त स्थायी समितीचे ८ सदस्य निवड करणे या एकाच विषयाकरीता बोलाविलेली आहे. दलित वस्तीचा विषय आजच्या सभेत नाही त्यामूळे दलित वस्तीच्या विषयावर आपणास बोलता येणार नाही. आपण जागेवर बसावे.

**विषय क्रं. १**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे १६ सदस्यापैकी खालील (०८) सदस्य दि. ०१.१२.२०१६ रोजी दुपारी निवृत्त होत आहे.

सर्वश्री

१ मोरे संजय गंगाधरराव, **भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी**

२ अन्नेवार गंगासागर संदिप, **भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी**

३ सौ.घोगरे इंदूबाई शिवाजीराव, **राष्ट्रवादी पक्ष**

४ बियाणी प्रविण बालाप्रसाद, **राष्ट्रवादी पक्ष**

५ गुर्रम विनयकुमार जगदिश, **शिवसेना पक्ष**

६ राओत्रे संगिता पुथ्वीराज, **शिवसेना पक्ष**

७ खेडकर ज्योती महेंद्र, **शिवसेना पक्ष**

८ सलिमा बेगम नुरुल्ला खान, **ऐ.आय.एम.आय.एम. संविधान आघाडी**

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (०८) जागावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ नुसार नविन (०८) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

<u>**टिपः-**</u> शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१०/प्र.क्र.-८५/नवि-३२ दि. ०६ जूलै २०१० नुसार विरोधी पक्ष नेते,सभागृह नेते, गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात, आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

**सभागृहनेता** स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अपक्ष आघाडी मार्फत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेता आमच्या पक्षा तर्फे (१) मोकले सोनाबाई रामचंद्र (२) देशमुख मंगला गजानन यांचे नांवे देण्यात येते त्यास मान्यता देण्यात यावी

**गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी** स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे तौलनिक संख्याबळ विचाराघेता घेता आमच्या पक्षा तर्फे (१) सय्यद जानी म. कासीम (२) चिखलीकर संदिप सुभाषराव यांचे नावे देण्यात येते त्यास मान्यता देण्यात यावी.

**विरोधी पक्ष नेता** स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर शिवसेना, भारतीय जनतपा पार्टी आघाडी तर्फे तौलनिक संख्याबळ विचाराघेता घेता आमच्या पक्षा तर्फे (१) कल्याणकर बालाजी दत्तराव (२) गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल (३) जाधव जयश्री आनंद यांचे नावे देण्यात येते त्यास मान्यता देण्यात यावी.

**गटनेता एआयएमआयएम-संविधान पार्टी तर्फे** स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर एआयएमआयएम-संविधान पार्टी आघाडी तर्फे तौलनिक संख्याबळ विचाराघेता घेता आमच्या पक्षा तर्फे (१) अंजुम बेगम शेख अफरोज यांचे नाव देण्यात येते त्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या ८ जागेवर त्या त्या पक्षातर्फे नामनिर्देशनाव्दारे पक्षच्या संख्यबळानुसार सभागृहनेता यांनी **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अपक्ष आघाडी तर्फे** (१) मोकले सोनाबाई रामचंद्र (२) देशमुख मंगला गजानन, **गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी** यांच्या तर्फे (३) सय्यद जानी म. कासीम (४) चिखलीकर संदिप सुभाषराव, **विरोधीपक्ष नेता** यांच्या तर्फे (५) कल्याणकर बालाजी दत्तराव (६) गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल (७) जाधव जयश्री आनंद, तर **गटनेता एआयएमआयएम-संविधान पार्टी आघाडी** तर्फे (८) अंजुम बेगम शेख अफरोज असे एकूण ०८ स्थायी समितीवर नविन सदस्यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. ११२** **ठराव**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (२०)३ (व सुधारीत कलम ३१(अ) मधील तरतूदीनूसार नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे / नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, राष्ट्रवादी व ए.आय.एम.आय.एम.-संविधान पार्टी आघाडीचे गट नेते यांनी दिनांक ०१.१२.२०१६ रोजी दुपार नंतर निवृत्त होणा-या स्थायी समितीचे (८) सदस्यांच्या जागेवर नविन (८) पालिका सदस्यांची नेमणूक करण्यासाठी सुचविलेल्या नावाप्रमाणे स्थायी समितीवर खालील (८) पालिका सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

१) मोकले सोनाबाई रामचंद्र, ( भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी )
२) देशमुख मंगला गजानन, ( भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी )
३) सय्यद जानी म. कासीम ( राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी )
४) चिखलीकर संदिप सुभाषराव, ( राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी )
५) कल्याणकर बालाजी दत्तराव, ( शिवसेना, भारतीय जनता पार्टी आघाडी )
६) गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल, ( शिवसेना, भारतीय जनता पार्टी आघाडी )
७) जाधव जयश्री आनंद, ( शिवसेना, भारतीय जनता पार्टी आघाडी )
८) अंजुम बेगम शेख अफरोज, ( ए.आय.एम.आय.एम-संविधान पार्टी आघाडी )

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेला विषय</u>**

**विषय:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कंत्राटी एकत्रीत वेतनावरील एकूण ०९ वैद्यकिय अधिकारी / सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV / सुपरवायझर-१ असे एकूण १० कर्मचारी कार्यरत असून त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असून व संबंधीताचे काम समाधानकारक असल्याचे प्र वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये २५,०००/- वर व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV / सुपरवायझर यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये १५,०००/- वर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं नावाशमनपा/आस्था-६/१६१७७/१६ दि. ०९.०३.२०१६ अन्वये खालील अधिकारी / कर्मचारी यांची सहा महिण्याची मुदतवाढ दिनांक २९.०६.२०१६ रोजी सपंत असल्यामुळे संबंधीतांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक ३०.०६.२०१६ चा त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रीक खंड देऊन दिनांक ०१.०७.२०१६ ते ३०.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देणेकरिता मान्यता घेऊन मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

| अ.क्रं. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदाचे नांव | एकत्रीत वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. प्रांजली पंकजराव जोशी | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०२ | डॉ. स्मिता गोविंदराव भट्टड | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०३ | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०४ | डॉ. मुजफर अमीना बेगम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०५ | डॉ. कोटलवार श्रुती राजेंद्र | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०६ | डॉ. राठोड विजया परशुराम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०७ | डॉ. राफे अ. खदीर | कंत्राटी वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०८ | डॉ. अन्सारी मो.राफे मो.इस्माईल | कंत्राटी सहा. वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| ०९ | डॉ. रिजवान अहेमद गुलाम रसुल | कंत्राटी सहा. वैद्यकिय अधिकारी | २५,०००/- | ३०.०६.२०१६ |
| १० | श्री सोळंके राम मारोतराव | सिनिअर डॉटस प्लस व TB/HIV / सुपरवायझर | १५,०००/- | ३०.०६.२०१६ |

**सभागृहनेता** कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांचा मुदतवाढीचा वरील प्रमाणे प्रस्ताव प्रशासना मार्फत आलेला असुन वरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची मुदत ३०.०६.२०१६ चा तांत्रीक खंड देवुन दिनांक ०१.०७.२०१६ ते ३०.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ तसेच दिनांक ३१.१२.२०१६ चा तांत्रीक खंड देवुन दिनांक ०१.०१.२०१७ ते २९.०६.२०१७ पर्यंत मुदतवाढ देणे तसेच सदरील वैद्यकिय अधिका-यांचे एकत्रीत वेतन रुपये २५,०००/- ऐवजी रुपये ४०,०००/- करण्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**महापौर** सभागृहनेता यांनी कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांचा मुदतवाढीचा वरील प्रमाणे प्रस्ताव प्रशासना मार्फत आलेला असुन वरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची मुदत ३०.०६.२०१६ चा तांत्रीक खंड देवुन दिनांक ०१.०७.२०१६ ते ३०.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ तसेच दिनांक ३१.१२.२०१६ चा तांत्रीक खंड देवुन दिनांक ०१.०१.२०१७ ते २९.०६.२०१७ पर्यंत मुदतवाढ देणे तसेच सदरील वैद्यकिय अधिका-यांचे एकत्रीत वेतन रुपये २५,०००/- ऐवजी रुपये ४०,०००/- करण्यास मान्यता देण्यात येते व ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**ठराव क्रं. ११३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कंत्राटी एकत्रीत वेतनावरील एकूण ०९ वैद्यकिय अधिकारी / सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV / सुपरवायझर-१ असे एकूण १० कर्मचारी कार्यरत असून त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असून व संबंधीताचे काम समाधानकारक असल्याचे प्र वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये २५,०००/- मंजुर करण्यात येतो. तसेच दिनांक ०१.०१.२०१७ पासुन कंत्राटी वैद्यकिय अधिकारी-०९ यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये २५,०००/- ऐवजी रुपये ४०,०००/- मंजुर करण्यात येते. व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV / सुपरवायझर यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये १५,०००/- वर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं नावाशमनपा/आस्था-६/१६१७७/१६ दि. ०९.०३.२०१६ अन्वये खालील अधिकारी / कर्मचारी यांची सहा महिण्याची मुदतवाढ दिनांक २९.०६.२०१६ रोजी सपंत असल्यामुळे संबंधीतांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक ३०.०६.२०१६ चा त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रीक खंड देऊन दिनांक ०१.०७.२०१६ ते ३०.१२.२०१६ पर्यंत तसेच दिनांक ३१.१२.२०१६ चा तांत्रीक खंड देवुन दिनांक ०१.०१.२०१७ ते दिनांक २९.०६.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्रं. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | डॉ. प्रांजली पंकजराव जोशी | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०२ | डॉ. स्मिता गोविंदराव भट्टड | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०३ | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०४ | डॉ. मुजफर अमीना बेगम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०५ | डॉ. कोटलवार श्रुती राजेंद्र | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०६ | डॉ. राठोड विजया परशुराम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी |
| ०७ | डॉ. राफे अ. खदीर | कंत्राटी वैद्यकिय अधिकारी |
| ०८ | डॉ. अन्सारी मो.राफे मो.इस्माईल | कंत्राटी सहा. वैद्यकिय अधिकारी |
| ०९ | डॉ. रिजवान अहेमद गुलाम रसुल | कंत्राटी सहा. वैद्यकिय अधिकारी |
| १० | श्री सोळंके राम मारोतराव | सिनिअर डॉटस प्लस व TB/HIV / सुपरवायझर |

**उपमहापौर** I.T.I. चौक जवळ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणीकरिता खाजगी जमीन मालकासोबत वाटाघाटी, रेडीरेकनर, FSI च्या स्वरुपात देवुन सदरची जागा मनपाकडे हस्तांतर करण्याबाबतचा प्रस्ताव आहेत त्यास मान्यता देण्यात यावी.

**सभागृहनेता** मा. उपमहापौर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**आनंद चव्हाण, फारुख अली खाँ** आमचेही अनुमोदन आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड I.T.I. चौक जवळ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणीकरिता मनपा सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०८.२०१३ ठराव क्रं. ६६ नुसार मान्यता प्राप्त आहे. तसेच मनपा सर्वसाधारण सभा दिनांक ३१.०३.२०१५ ठराव क्रं. २०६ अन्वये पुतळयाच्या व लेबर कॉलनी रोड मधील त्रिकोणी शिल्लक जागा महापालिकेतर्फे संपादन करकण्याकरिता लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उक्त पुतळे उभारणीकरीता लागणा-या एकूण २८५.०० चौ.मी. जागेपैकी १५०.०० चौ.मी. जागा शासकीय तंत्रनिकेतन यांचेकडून मनपाकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. उर्वरीत १३५.०० चौ.मी. जागे बाबत न्यायालयाकडून वादअसल्यामुळे जागा हसतांतरण रखडलेले होते. नुकतेच सदरील जागेबाबतचा न्यायालयाकडून निकाल खाजगी जमीन मालकांकडून लागलेला आहे. उपरोक्त पुतळे उभारण्यासाठी सदरील जागा खाजगी जमीन मालकांसोबत वाटाघाटी करुन त्यांना देय असलेली रक्कम शिघ्र सिध्द गुणकाचे दरानुसार (Ready Recknor) अथवा FSI च्या स्वरुपात मावेजा देऊन हस्तांतर करुन घेण्याकरीता लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात येते. सदरील जागा हस्तांतरण करण्याबाबतचे संपुर्ण अधिकार आयुक्त यांना ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**सुचक**:- शफी अहेमद कुरेशी, स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- आनंद चव्हाण, हसीना बेगम साबेर चाऊस, फारुख अली खाँ

**महापौर** उपमहापौर, सभागृहनेता, यांनी जो प्रस्ताव मांडला व त्यास श्री आनंदा चव्हाण व फारुख अली खाँ यांनी अनुमोदन दिल्यामुळे सदरील प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ११४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड I.T.I. चौक जवळ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणीकरिता मनपा सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०८.२०१३ ठराव क्रं. ६६ नुसार मान्यता प्राप्त आहे. तसेच मनपा सर्वसाधारण सभा दिनांक ३१.०३.२०१५ ठराव क्रं. २०६ अन्वये पुतळयाच्या व लेबर कॉलनी रोड मधील त्रिकोणी शिल्लक जागा महापालिकेतर्फे संपादन करकण्याकरिता लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उक्त पुतळे उभारणीकरीता लागणा-या एकूण २८५.०० चौ.मी. जागेपैकी १५०.०० चौ.मी. जागा शासकीय तंत्रनिकेतन यांचेकडून मनपाकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. उर्वरीत १३५.०० चौ.मी. जागे बाबत न्यायालयाकडून वादअसल्यामुळे जागा हसतांतरण रखडलेले होते. नुकतेच सदरील जागेबाबतचा न्यायालयाकडून निकाल खाजगी जमीन मालकांकडून लागलेला आहे. उपरोक्त पुतळे उभारण्यासाठी सदरील जागा खाजगी जमीन मालकांसोबत वाटाघाटी करुन त्यांना देय असलेली रक्कम शिघ्र सिध्द गुणकाचे दरानुसार (Ready Recknor) अथवा FSI च्या स्वरुपात मावेजा देण्यासाठी आवश्यक्ता असल्यास शासनाचे मार्गदर्शन घेऊन हस्तांतर करुन घेण्याकरीता लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात येते. सदरील जागा हस्तांतरण करण्याबाबतचे संपुर्ण अधिकार आयुक्त यांना ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**मोरे संजय** — माझा पुढील प्रमाणे प्रस्ताव आहे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सर्वे नं. ८० मौ. कौठा मधील २०R जमीन शासनाच्या मालमकीची असुन सदर जागेपैकी रस्तारुंदीकरणात जमीन संपादीत झालेली आहे व उर्वरीत जमीन सार्वजनिक वापरासाठी मागणी करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असा प्रस्ताव असुन त्यासमान्यता देवुन याच सभेत कायम करण्यात यावा.

**देशमुख मंगला** — श्री मोरे संजय यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदक आहे.

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सर्वे नं. ८० मौ. कौठा मधील २०R जमीन शासनाच्या मालमकीची असुन सदर जागेपैकी रस्तारुंदीकरणात जमीन संपादीत झालेली आहे व उर्वरीत जमीन सार्वजनिक वापरासाठी मागणी करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असा प्रस्ताव असुन त्यासमान्यता देवुन याच सभेत कायम करण्यात यावा.

**सुचक:**- मोरे संजय **अनुमोदक** :- देशमुख मंगला

**महापौर** — श्री संजय मोरे यांनी पुढील प्रमाणे प्रस्ताव मांडला नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सर्वे नं. ८० मौ. कौठा मधील २०R जमीन शासनाच्या मालमकीची असुन सदर जागेपैकी रस्तारुंदीकरणात जमीन संपादीत झालेली आहे व उर्वरीत जमीन सार्वजनिक वापरासाठी मागणी करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ११५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सर्वे नं. ८० मौ. कौठा मधील २०R जमीन शासनाच्या मालमकीची असुन सदर जागेपैकी रस्तारुंदीकरणात जमीन संपादीत झालेली आहे व उर्वरीत जमीन सार्वजनिक वापरासाठी मागणी करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**किशोर यादव** — मा. महापौर साहेब माझ्या प्रभागातील रस्त्यांना नाव देण्याचे दोन प्रस्ताव आहे त्यास मान्यता देण्यात यावी. (१) मनपा हद्यीतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाा समोरील न्यायालयाच्या बाजुने जाणा-या रस्ता ते श्री गुरु गोविंदसिंघजी मोमोरील हॉस्पीटल मागील बाजुस गेट पर्यंतच्या रस्त्यास (जिल्हा परिषद मुलींची शाळा समोरील रस्ता) सुप्रसिध्द विधीतज्ञ **कै. अड आर. आर. खांडील** यांचे नांव देणे (२) प्रभाग क्रं. ३५ मधील वजिराबाद येथील अंबेकर निवास ते प्रतिभा निकेतन महाविद्यालयाकडे जाणा-या रस्त्यास माजी नगराध्यक्ष **कै. नरेंद्रपाल बरारा मार्ग** असे नांव देण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**विरोधी पक्षनेता** — मनपा हद्यीतील एम.जी. रोड वरील गबाळे यांच्या दुकानापासुन गणपती मंदिर (लोहार गल्ली) डॉ. तापाडीया यांच्या घरा पर्यंतच्या रस्त्यास **समाजसेवक स्व. काशिनाथसिंह गंगुसिंह रावत मार्ग** असे नाव देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी

**अ. सत्तार अ. गफुर** — प्रभाग क्रं. २६ मध्ये मस्जीद खुबा ते मस्जीद सल्मान फारसी रजी. पर्यंतच्या रस्त्यास **हजरत मौलाना अब्दुल जब्बार खासमी मार्ग** हे नांव देण्यास मान्यता देवुन तसा बोर्ड लावण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात यावी.

**महापौर** — श्री किशोर यादव, विरोधी पक्षनेता व अ. सत्तार अ. गफुर यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.११६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील खालील रस्त्यांना, यापुर्वी कोणत्याही प्रकारचे नाव देण्यात आलेले नसेल या अटीवर खालील रस्त्यांच्या नावा समोर दर्शविण्यात आलेले नाव देण्यास व बोर्ड लावण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते यापुर्वी नाव देण्यात आलेले असेल तर पुर्वीच्याच नाव कायम ठेवण्यात ठेवण्यात यावे त्यात बदल करण्यात येवू नये असे ही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| | | |
|---|---|---|
| १ | मनपा हद्दीतील छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळया समोरील न्यायालयाच्या बाजुने जाणा-या रस्ता ते श्री गुरु गोविंदसिंघजी मेमोरीयल हॉस्पीटल मागील बाजुस गेट पर्यंतच्या रस्त्यास (जिल्हा परिषद मुलींची शाळा समोरील रस्ता) रस्त्यास | **विधीतज्ञ कै. अड. आर. एन. खांडील मार्ग** |
| २ | मनपा हद्दीतील एम.जी. रोड वरील गबाळे यांच्या दुकाना पासुन गणपती मंदिर (लोहार गल्ली) डॉ. तापाडीया यांच्या घरा पर्यंतच्या रस्त्यास | **समाजसेवक स्व. काशिनाथसिंह गंगुसिंह रावत मार्ग** |
| ३ | मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. २६ मध्ये मस्जीद खुबा ते मस्जीद सल्मान फारसी पर्यंतच्या रस्त्यास | **हजरत मौलाना अब्दुल जब्बार खासमी मार्ग** |
| ४ | मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. ३५ मधील वजिराबाद येथील आंबेकर निवास ते प्रतिभा निकेतन महाविद्यालयाकडे जाणा-या रस्त्यास. | **कै. नरेंद्रपाल बरारा मार्ग** |

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ७३ अन्वये मनपा हद्दीत विविध प्रभागात दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गतची कामे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि सदरील ठरावात नमुद करण्यात आलेल्या कामास ज्या सदस्यांना बदल करावयाचे असल्यास त्यांनी मा. महापौर यांच्याकडे लेखी स्वरुपात देवुन त्यानुसार मा. महापौर यांना दुरुस्त करण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यात येते. त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**सुचक**:- प्रमोद बंडु खेडकर, रावत दिपकसिंह काशिनाथसिंह, अ. सत्तार अ. गफुर, स. शेर अली महेबुब अली.

**अनुमोदक**:- विनय विश्वंबरराव पाटील, सतिश शेषप्पा राखेवार.

**विरोधीपक्ष नेता, रावत दिपकसिंह, अ.सत्तार, स.शेर अली** मा. महापौर आमच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**विनय पाटील, सतिश राखेवार** वरील प्रस्तावास आमचे अनुमोदन आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ११७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ७३ अन्वये मनपा हद्दीत विविध प्रभागात दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गतची कामे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि सदरील ठरावात नमुद करण्यात आलेल्या कामास ज्या सदस्यांना बदल करावयाचे असल्यास त्यांनी मा. महापौर यांच्याकडे लेखी स्वरुपात देवुन त्यानुसार मा. महापौर यांना दुरुस्त करण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यात येते. त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १५ मध्ये प्रा. राठोड यांचे घर ते छोटी दर्गाह - कालापुल पर्यंत डांबरीकरण रस्त्याची पुर्नबांधणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती सदरच्या रस्त्यावर पाणी साचत असल्याने सदर कामा ऐवजी प्रभाग क्रं. ३४ गाडीपुरा येथे विशेष रस्ते अनुदान अंतर्गत धोबी गल्ली भागात श्री परदेशी यांच्या घरा पासुन बडी मंढी पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक:**- रावत दिपकसिंह काशिनाथसिंह **अनुमोदक** :- प्रमोद बंडु खेडकर

**रावत दिपकसिंह** माझा वरील प्रमाणे प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**विरोधीपक्षनेता** श्री रावत दिपकसिंह यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे

**महापौर** श्री दिपकसिंह यांनी जो प्रस्ताव मांडल्यास त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ११८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १५ मध्ये प्रा. राठोड यांचे घर ते छोटी दर्गाह - कालापुल पर्यंत डांबरीकरण रस्त्याची पुर्नबांधणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती सदरच्या रस्त्यावर पाणी साचत असल्याने सदर कामा ऐवजी प्रभाग क्रं. ३४ गाडीपुरा येथे विशेष रस्ते अनुदान अंतर्गत धोबी गल्ली भागात श्री परदेशी यांच्या घरा पासुन बडी मंढी पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १७ मध्ये प्रभाग क्रं. १९ मध्ये वाहेदनगर भागात डांबरीकरण रस्त्याची पुर्नबांधणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे वास्तविक पहाता सदर भागात अरुंद गल्ल्या असल्यामुळे डांबरीकरण करणे शक्य नाही त्यामुळे सदर कामा ऐवजी प्रभाग क्रं. १९ मध्ये वाहेदनगर भागात सिमेंट रोड करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक:-** गफार खान गुलाम महमंद खान **अनुमोदक** :- उमेशसिंह चव्हाण

**गफार खान** माझा वरील प्रस्ताव प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा..

**उमेश चव्हाण** श्री गफार खान यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री गफार खान यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.११९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १७ मध्ये प्रभाग क्रं. १९ मध्ये वाहेदनगर भागात डांबरीकरण रस्त्याची पुर्नबांधणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे वास्तविक पहाता सदर भागात अरुंद गल्ल्या असल्यामुळे डांबरीकरण करणे शक्य नाही त्यामुळे सदर कामा ऐवजी प्रभाग क्रं. १९ मध्ये वाहेदनगर भागात सिमेंट रोड करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. २५ मध्ये पाकीजा नगर येथील अस्तीत्वात असलेला मोठा नाला असुन सदरील नाला हे श्री फेरोज यांचे घर ते श्री इसाक भाई ऑटोवाले यांच्या घरा पर्यंत नाल्याचे आरसी.सी. बांधकाम व आर.सी.सी. स्लॅब करण्यासाठी लागणा-या अंदाजे रुपये १०.०० लक्ष खर्च हे १४व्या वित्त आयोगामधुन करण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- विनय पाटील

**अ. सत्तार अ. गफुर** माझा वरील प्रमाणे प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**विनय पाटील** श्री अ. सत्तार अ. गफुर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री अ. सत्तार अ. गफुर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१२०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. २५ मध्ये पाकीजा नगर येथील अस्तीत्वात असलेला मोठा नाला असुन सदरील नाला हे श्री फेरोज यांचे घर ते श्री इसाक भाई ऑटोवाले यांच्या घरा पर्यंत नाल्याचे आरसी.सी. बांधकाम व आर.सी.सी. स्लॅब करण्यासाठी लागणा-या अंदाजे रुपये १०.०० लक्ष खर्च हे १४व्या वित्त आयोगामधुन करण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०१.२०१६ ठराव क्रं. १०४ अन्वये बिओटी तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधून त्यात ड्रेनेज लाईन व नळ जोडणी व इतर सुविधेसह २० वर्षासाठी दैनिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करून महापौर व आयुक्त हे संयुक्तरित्या ठरवितील या नियम व अटी प्रमाणे भाडेपट्टीवर संस्था चालकांना देणेसाठी मान्यता देण्यात आलेले आहे. करिता शहरातील मुख्य ठिकाणी PPP तत्वावर सार्वजनिक शाचालय (१) सिडको बस स्थानक, (२) सिडको सराफा बाजार (३) ढवळे कार्नर (४) शिवाजीनगर वाडीयार डॉक्टर लेन या ठिकाणी सुध्दा PPP तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधुन सुरु करण्यास हि नावाशमनपाकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक:**- सौ. मंगलाताई गजानन देशमुख **अनुमोदक**:- येवनकर विजय हिराचंद

**देशमुख मंगला** माझा वरील प्रमाणे प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**येवनकर विजय** सौ. देशमुख मंगला यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे

**महापौर** सौ. देशमुख मंगला यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. १२१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०१.२०१६ ठराव क्रं. १०४ अन्वये बिओटी तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधून त्यात ड्रेनेज लाईन व नळ जोडणी व इतर सुविधेसह २० वर्षासाठी दैनिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करून महापौर व आयुक्त हे संयुक्तरित्या ठरवितील या नियम व अटी प्रमाणे भाडेपट्टीवर संस्था चालकांना देणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. करिता

शहरातील मुख्य ठिकाणी PPP तत्वावर सार्वजनिक शाचालय (१) सिडको बस स्थानक, (२) सिडको सराफा बाजार (३) ढवळे कार्नर (४) शिवाजीनगर वाडीयार डॉक्टर लेन या ठिकाणी सुध्दा PPP तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधुन सुरु करण्यास हि नावाशमनपाकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १२ मध्ये बाफना ते टॉवर ते नविन पुल रस्त्याची पुर्नबांधणी करणे रुपये १०.०० चेकामे करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती सदरच्या कामासाठी जास्तीची निधी लागत असल्याने हे काम करणे शसक्य नाही सदरच्या कामा ऐवजी प्रभाग क्रं. २३-ब मध्ये बाफना येथे श्री संधु यांचे घरा पासुन ते श्री पल्लु यांचे घरा पर्यंत सि.सि. रस्ता करण्यासाठी रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- स. गिल सरजीतसिंघ मेजर पंजाबसिंघ **अनुमोदक** :- अ. सत्तार अ. गफुर

**गिल सरजीतसिंघ** माझा वरील प्रमाणे प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**अ. सत्तार अ. गफुर** श्री गिल सरजीतसिंघ यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री गिल सरजीतसिंघ यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १२२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१६ ठराव क्रं. ६४ अन्वये विशेष रस्ते अनुदान अंतर्गतची कामे करण्यासाठी अनुक्रमांक १२ मध्ये बाफना ते टॉवर ते नविन पुल रस्त्याची पुर्नबांधणी करणे रुपये १०.०० चेकामे करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती सदरच्या कामासाठी जास्तीची निधी लागत असल्याने हे काम करणे शसक्य नाही सदरच्या कामा ऐवजी प्रभाग क्रं. २३-ब मध्ये बाफना येथे श्री संधु यांचे घरा पासुन ते श्री पन्नु यांचे घरा पर्यंत सि.सि. रस्ता करण्यासाठी रक्कम रुपये १०.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. २ मध्ये श्री नागरगोजे यांचे घर ते श्री सुकळकर यांचे घरा पर्यंत सि.सि. रस्ता करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये ४.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक:**- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- स. गिल सरजीतसिंघ

**अ. सत्तार अ. गफुर** वरील प्रमाणे माझा प्रस्ताव असुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा

**गिल सरजीतसिंघ** श्री अ. सत्तार अ. गफुर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री अ. सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १२३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. २ मध्ये श्री नागरगोजे यांचे घर ते श्री सुकळकर यांचे घरा पर्यंत सि.सि. रस्ता करण्यासाठी अंदाजीत रक्कम रुपये ४.०० लक्षाचे काम करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जहिर करण्यात येते. शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येते. शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**महापौर**
नावाशमनपा नांदेड